मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शुक्रवार, दि. 8 नोव्हेंबर 2024 | पान- 1

# पिंपरी चिंचवड शहरात स्टार प्रचारकांच्या तोफा धडाडणार...

## पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि मावळ मतदारसंघात दुरंगी लढत : महाविकास आघाडी आणि महायुतीच्या वतीने प्रचाराचे जोरदार नियोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि मावळ मतदारसंघात दुरंगी लढत होत आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीच्या वतीने प्रचाराचे जोरदार नियोजन करण्यात आले आहे. बुधवारपासूनच नेत्यांच्या तोफा पिंपरी-चिंचवड शहरात धडाडण्यास सुरुवात झाली आहे.

शहरात पिंपरी, चिंचवड आणि भोसरी असे तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. शहराच्या सीमेवर मावळ मतदारसंघ आहे. प्रचारासाठी आता केवळ बारा दिवस उरले आहेत. त्यामुळे रिंगणातील उमेदवार आणि कार्यकर्ते प्रचारात गुंतले आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीने निवडणूक प्रचारासाठी नेत्यांना बोलावले आहे.




पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणावर कामगारवर्ग वास्तव्यास आहे. राज्याच्या आणि देशाच्या विविध भागांतून नागरिक नोकरी, उद्योग-व्यवसायाच्या निमित्ताने आले आहेत. वेगवेगळ्या भागातील मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी त्यांच्या भागातील नेत्यांच्या सभा आणि बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

भाजपच्या वतीने बुधवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा पार पडली.. त्याचबरोबर भोसरीत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पंकजा मुंडे आदी नेत्यांच्या सभा होणार आहेत, असे पक्षाचे प्रवक्ते राजू दुर्गे यांनी सांगितले.

काँग्रेसच्या वतीने प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, सतेज पाटील, खासदार प्रणिती शिंदे, खासदार विशाल पाटील, अमित देशमुख यांच्या सभा होणार आहेत, अशी माहिती काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या यतीने पक्षाध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार श्रीनिवास पाटील, रोहित पवार यांच्या सभा होणार आहेत, अशी माहिती शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या यतीने उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सभा होणार आहेत. त्याचबरोबर इतर नेत्यांनाही निमंत्रित करणार असल्याचे सांगण्यात आले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने सभांचे नियोजन सुरू असल्याचे शहरप्रमुख सचिन भोसले यांनी सांगितले. शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर नेत्यांना प्रचारासाठी आणणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# बदल हवा हीच थेरगाव-काळेवाडीकरांची भावना

## राहुल कलाटेंच्या पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांनी काळेवाडी, थेरगाव परिसरातून काढलेल्या पदयात्रेला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. जागोजागी समर्थनाच्या जोरदार घोषणांनी कलाटे यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी चिंचवडमध्ये यंदा बदल हवा असल्याच्या भावना नागरीकांनी कलाटे यांच्याकडे व्यक्त केल्या.

काळेवाडीतील ज्योतिबा मंदिरात नारळ फोडून पदयात्रेला व प्रचाराला सुरुवात झाली. यावेळी श्यामराव काळे संजोग वाघेरे, हरिष नखाते, अनिता तुतारे, ज्ञानेश्वर बलशेट्टी, सागर तापकीर, सज्जी वर्गी, चंद्रशेखर जाधव, सुजाता नखाते दिनेश नढे, सचिन लिमकर, गोरख पाटील, ओम क्षीरसागर, अक्षय घोडके यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे कार्यकर्ते पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पदयात्रेतुन थेरगाव परिसरासह ज्योतिबा नगर, विजय नगर, काळेवाडी परिसर पिंजून काढण्यात आला.

'एकच वादा राहुल दादा', 'येऊन येऊन येणार कोण राहुल दादांशिवाय शिवाय आहेच कोण' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी नागरिकांनी विविध समस्यांचे गाऱ्हाणे कलाटेंसमोर मांडून आम्हाला आता चिंचवडमध्ये बदल हवा असून सुसंस्कृत, सुशिक्षित, अभ्यासू आणि आमचे प्रश्न कायमचे सोडविणारा आमदार हवा असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.



दरम्यान कलाटे यांनी चिंतामणी चौक, वाल्हेकर वाडी येथील मंडप मालक वेलफेअर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना भेटून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या यावेळी चिंचवड शहराचे अध्यक्ष नितीन गवळी, स्थानिक नागरिक व मोठ्या संख्येने मतदार उपस्थित होते.

> कचरा डेपोची जागा ताब्यात घेण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना ग्रामस्थासह प्रखर विरोध करून रिकाम्या हाताने परतवून लावण्यात होते. तत्कालीन मुख्यमंत्री व उद्योग मंत्र्यांची वारंवार भेट घेऊन डेपो रद्द करण्याची मागणी मी लावून धरली होती. त्यामुळे पूनावळेकर सुज्ञ आहेत, कचरा प्रश्न कोणी सोडवला हे त्यांना चांगलेच माहिती आहे. विरोधकांनी या प्रश्नावर काय फॉलोअप केला ते दाखवावे. चिंचवडला दहा वर्ष पाणी मिळालं नाही, पुन्हा फक्त आश्वासन देण्यात येत आहेत. मला संधी मिळाल्यावर पाणी, रस्ते आणि इतर प्रश्नातून चिंचवडकरांची कायमची मुक्तता करण्याची ग्वाही मी जनतेला दिली आहे.
>
> - राहुल कलाटे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, महाविकास आघाडी उमेदवार.

# आमदार अण्णा बनसोडे यांच्या पदयात्रेस उत्स्फुर्त प्रतिसाद

## दापोडीमध्ये बहिणींची लक्षणीय उपस्थिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना, आरपीआय (आठवले), रासप या महायुतीचे पिंपरी विधानसभेचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी बुधवारी (दि. 6) दापोडी परिसरात पदयात्रा काढली. या पदयात्रेमध्ये लाडक्या बहिणींची लक्षणीय उपस्थिती होती. अण्णा बनसोडे यांना पुन्हा एकदा पिंपरीचे आमदार करण्यासाठी दापोडी मधील सर्व लाडक्या बहिणी सरसावल्या.



दापोडी येथे महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन झाले. यावेळी आमदार अमित गोरखे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, उमेश चांदगुडे, इरफान सय्यद, माई काटे, चंद्रकांता सोनकांबळे, सुजाता पालांडे, नंदू कदम, शितल हगवणे, शेखर काटे, संजय अवसारमल संजय काटे, राजू बनसोडे, कविता अल्हाट, सुप्रिया काटे, सिकंदर सूर्यवंशी, गंगा धेंडे, संतोष काटे, प्रणव गायकवाड, हर्षल मोरे, ज्ञानेश्वर कांबळे, अविनाश काटे, कुणाल लांडगे, विशाल वाळुंजकर, आनंद ओव्हाळ, सुवर्णा कुटे, सरिता साने, तसेच आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दापोडी गावठाण येथे भव्य हार घालून आमदार अण्णा बनसोडे यांचे स्वागत करण्यात आले. फिरंगाई देवीच्या आरतीने पदयात्रेला सुरुवात झाली. दरम्यान अण्णा बनसोडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. साई बाबा, विठ्ठल मंदिर आणि इतर मंदिरांना भेटी दिल्या. तसेच माजी नगरसेवक संजय नाना काटे, चंद्रकांता सोनकांबळे, सिकंदर सूर्यवंशी, अकील शेख, संजय औसरमल, सुप्रिया काटे, संतोष काटे, सत्यवान काटे, ऋषभ काटे, सुहास काटे, अस्मिता कांबळे व इतर पदाधिकाऱ्यांच्या घरी अण्णा बनसोडे यांनी भेटी दिल्या.

सिद्धार्थ नगर, नरवीर तानाजी पुतळा, पवार वस्ती, एसएमएस कॉलनी, आत्तार वीटभट्टी, महाविहार, काची वाडा, फुलेनगर, बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, खालची आळी, विठ्ठल मंदिर, समर्थ व्यायाम शाळा, शिवम मित्र मंडळ, आझाद मित्र मंडळ, वरची आळी विठ्ठल मंदिर, 11 नंबर बस स्टॉप, मंत्री कॉम्प्लेक्स, सुंदरबाग, गणेश गार्डन या मार्गावरून पदयात्रा काढली.

# त्यांच्या नाकर्तेपणामुळे व निष्क्रियतेमुळे मावळात भाजप पक्ष संपत चाललाय : आमदार सुनील शेळके

## त्यांच्या अपयशाचे खापर ते माझ्यावर फोडत आहेत असा पलटवार त्यांनी संजय तथा बाळा भेगडे व गणेश भेगडे यांच्यावर केला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

मावळातून भाजप संपवायचं 'कारस्थान' नेमकं कुणाचं? असा प्रश्न 2024 च्या विधानसभेच्या निमित्ताने वारंवार विचारला जात आहे. व हाच मुद्दा पुढे करत यावेळी मावळातील भाजपच्या सर्वसामान्य पदाधिकारी व कार्यकर्ते यांना भडकवले जात आहे. यावर बोलताना आमदार सुनील शेळके म्हणाले, मी म्हणजेच भाजपा असे समजणाऱ्या त्या दोन चार नेत्यांच्या नाकर्तेपणामुळे मावळ तालुक्यात भाजपा पक्ष संपत चालला आहे. आता त्यांच्या अपयशाचे खापर ते माझ्यावर फोडत आहेत असा पलटवार त्यांनी संजय तथा बाळा भेगडे व गणेश भेगडे यांच्यावर केला आहे.



भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची व सर्वसामान्य कार्यकर्त्यांची दिशाभूल करण्याच्या तुमच्या कारस्थानांमुळेच 2019 मध्ये जनतेचा उद्रेक झाला, जनता माझ्यामागे उभी राहिली व जनतेने निवडणूक हातात घेतली. त्याचा परिणाम म्हणून बाळाभाऊंना पराभव पत्करावा लागला. ज्या पक्षाने आपल्याला व कुटुंबाला सहा वेळा संधी दिली. दोन वेळा आमदार केले, मंत्री केले. एकनिष्ठेने प्रामाणिक पाठीशी उभे राहून आपल्या विजयासाठी जीवाचे रान करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याला, मतदाराला बाळाभाऊ तुम्ही पराभवानंतर अक्षरशः वाऱ्यावर सोडले. पक्षाने सर्वकाही दिल्यानंतर दिल्यानंतरही आपण हार मान्य करू शकला नाही. कोविडच्या संकटात आपण नागरिक व सामान्य कार्यकर्त्याला, पदाधिकाऱ्यांना वाऱ्यावर सोडले. त्यांना लसीकरण, रेमडेसिवीर, ऑक्सिजन सिलेंडर उपलब्ध करून दिले नाही. उपासमारीची वेळ आलेल्या गरजू कुटुंबांच्या दोन वेळच्या जेवणाची सोय करू शकला नाहीत.

बाळाभाऊ, आपल्या नाकर्तेपणा व निष्क्रियतेमुळे तालुक्यातील भाजप संपत चाललाय हे पक्षातील कार्यकर्त्यांबरोबरच सर्वसामान्य जनतेलाही कळतंय. आपले अपयश झाकण्यासाठी माझ्यावर खोटेनाटे आरोप करू नका. तुम्ही वेळ दिला नाही, लोकांच्या समस्या समजून घेतल्या नाही, लोकांना वाऱ्यावर सोडले म्हणून पक्षावर ही वेळ आली. हे सर्व जनतेला कळते. त्यामुळे भाजपचे कार्यकर्ते, मतदार व सर्वसामान्य जनता तुमच्या भूलथापांना बळी पडणार नाही. पराभवानंतरही भाजपने गेल्या पाच वर्षांत बाळाभाऊंना विविध महत्त्वाची पदे देऊन ताकद देण्याचे, न्याय देण्याचे काम केले. त्याच पद्धतीने त्यांनी पक्षाचे अन्य पदाधिकारी व सामान्य कार्यकर्ते यांना ताकद दिली नाही. तालुक्याला वेळ न देता, आपण तालुक्याबाहेर जाऊन पुढारपणाच्या गप्पा मारण्यातच धन्यता मानली. भाजपमधील अनेक जुने सहकारी 2021 नंतर पक्ष सोडून माझ्याबरोबर काम करू लागले, याला बाळाभाऊ आपण स्वतः कारणीभूत आहात.

गेली अडीच वर्षे आपण डीपीडीसीचे सदस्य झाला. जिल्ह्याचे निधीवाटप आपण व गणेशतात्या करतो, असे आपण जाहीरपणे सांगत होता. आता जाहीरपणे सांगा की, तालुक्याला किती निधी आणला, किती बेरोजगारांच्या हाताला कामे दिली, किती कार्यकर्त्यांना कामे दिली? आपण फक्त आणि फक्त जवळच्या लोकांनाच कामे दिली. आपण फक्त आणि फक्त टक्केवारी कमविण्यासाठीच पदाचा गैरवापर केलात. दहा वर्षात कार्यकर्त्यांना ताकद दिली असती तर आज ते देखील मोठे झाले असते मात्र तुम्हाला तुमच्या पेक्षा कोणी मोठे झालेले पटत नाही म्हणून तुम्ही 2019 ला मला व 2019 नंतर रवींद्र भेगडे यांच्यासारख्या उमद्या कार्यकर्त्यालाही राजकारणातून उठवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे. आजही आपण भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची माथी भडकवण्याचे काम करीत आहेत. अशी कितीतरी उदाहरणे आपल्याला गावोगाव पाहायला मिळतील. त्यामुळे मोजके दोन-चार खंदे समर्थक पुढारी वगळता बाकी भाजपचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते महायुतीचा धर्म पाळतील व पक्षाच्या आदेशानुसार माझ्या पाठीशी उभे राहतील व भाजपा पक्षाला मजबूत करतील.

गेल्या अडीच वर्षात मला त्रास देण्यात आपण कोठेही कमी पडला नाहीत. माझ्या उद्योग-व्यवसायावर राष्ट्रीय हरित लवादाची चौकशी बसवली, प्राप्तिकर विभाग, जीएसटी ऑफिसकडे तक्रारी केल्या. कोणताही संबंध नसताना मला खोट्या गुन्ह्यात गोवून उध्वस्त करण्याचा प्रयत्न केलात. एवढे सर्व करण्याऐवजी आपण भाजप कार्यकर्त्यांना व सर्वसामान्य जनतेला वेळ देऊन त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले असते तर दुसऱ्याच्या खांद्यावर बंदूक ठेवून तिसऱ्यावर गोळ्या झाडण्याची नामुष्की आपल्यावर ओढवली नसती! भाजपचे दोन ज्येष्ठ नेते गावोगाव जाऊन भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची माथी भडकवण्याचे काम करीत आहेत. याच मंडळींनी राजकारणातून मला संपवण्याचा प्रयत्न केला. त्याच पद्धतीने 2019 नंतर रवींद्र भेगडे यांच्यासारख्या उमद्या कार्यकर्त्यालाही त्यांनी राजकारणातून उठवण्याचा पुरेपूर प्रयत्न चालविला आहे.

त्यामुळे भाजपा पक्षाचे खरे मारेकरी कोण आहेत? कोणी स्वतःच्या स्वार्थापायी मावळात भाजपा पक्ष संपवला हे आता सर्वांच्या ध्यानात आले आहे. केवळ व केवळ तुमच्या निष्क्रियेमुळे व अहंकारामुळे आज मावळात भाजपा पक्ष द्विधा मनस्थितीत आहे. महायुतीचा उमेदवार असताना त्याला विरोध करत आपण केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी व भवकीला कामधंदे मिळावे म्हणून अपक्ष उमेदवाराला पाठिंबा देत भाजपा पक्षात उभी फूट पाडली आहे. हे हा मावळ तालुका कधीच विसरणार नाही.*

1938 साली मावळात जनसंघाची स्थापना झाली तेव्हापासून 2019 पर्यंत संपूर्ण शेळके परिवार पक्षासोबत एकनिष्ठ आहे. हे मावळ तालुक्यातील सर्व जुन्या जाणत्या मंडळींना माहीत आहे.

# महाराष्ट्राचा स्वाभिमान व रक्षणासाठी महाविकास आघाडीला विजयी करा : खासदार डॉ. अमोल कोल्हे

## असे आवाहन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी वाकड येथे केले

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र चुकीला माफी करतो मात्र, गद्दारांना कधीच क्षमा करत नाही. महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी देणारी ही लढाई आहे. बापाशी गद्दारी करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवायची वेळ आली आहे. आता पवार साहेबांना केवळ जिंकताना पाहायचं असून महाराष्ट्राच्या रक्षणासाठी व स्वाभिमानासाठी महाविकास आघाडीला विजयी करा असे आवाहन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी वाकड येथे केले.



महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांच्या प्रचाराचा बुधवारी (ता. ६) ग्रामदैवत म्हातोबा चरणी डॉ. अमोल कोल्हे, शिवसेनेचे संपर्क प्रमुख सचिन अहिर यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षाचे नेते, पदाधिकारी यांच्या हस्ते नारळ फोडून शुभारंभ झाला. यावेळी ते बोलत होते. संजोग वाघेरे, तुषार कामठे, इम्रान शेख, मयुर कलाटे, संपत पवार, माजी सरपंच राजाभाऊ भुजबळ, विशाल वाकडकर, अनिता तुतारे, सागर तापकीर, विशाल काळभोर, मयूर जाधव, विक्रम वाघमारे, चेतन पवार, साकी गायकवाड, मोहन भुमकर, ज्योती निंबाळकर, चेतन बेंद्रे, विक्रम विनोदे, केसरीनाथ पाटील, कौस्तुभ नवले, मोहन विनोदे यांच्यासह विविध पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोल्हे पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांचा महाराष्ट्र धर्म जागविताना मोठे बलिदान द्यावे लागले. मात्र, हाच महाराष्ट्र धर्म दिल्लीकरांनी संपविण्याचा प्रयत्न केला तेंव्हा ८४ वर्षांचा योद्धा सरसावला. सचिन अहिर म्हणाले, २३ तारखेला गुलाल उधळायाला आणि म्हातोबा चरणी नतमस्तक व्हायला सर्वांना पुन्हा यावं लागेल. राहुल कलाटेंना व महाविकास आघाडीला विजयी करण्याची आपली सामूहिक जबाबदारी आहे. राहुल कलाटे म्हणाले, महाविकास आघाडीतील सर्व वरिष्ठ नेत्यांनी वाकड वासियांवार टाकलेला विश्वास आपल्याला सार्थ करायचा आहे. मागिल अनुभव आणि येणारीं निवडणूक याची उत्तम सांगड घातली तर विजयापासून आपल्याला कोणी रोखणार नाही.

शुभारंभानंतर काढण्यात आलेल्या पदयात्रेला नागरिकांची प्रचंड गर्दी झाली होती. हलगी, तुतारी, ताशाच्या गजरात निघालेल्या पदयात्रेचे फटाक्याच्या आतिषबाजीत जागोजागी स्वागत झाले. वाकड गवठाण, वाकड चौक, उत्कर्ष चौक, माऊली चौक, अण्णाभाऊ साठे चौक, सम्राट चौक, वेणु नगर, पिंक सिटी रोड, छत्रपती चौक, अंबियांस हॉटेल-मानकर चौक, वाकड चौक या मार्गे भव्य पदयात्रा काढण्यात आली. संपत विनोदे यांनी सूत्रसंचालन केले.

# विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर डॉक्टरांचा जाहीरनामा!

## रुग्णालयांशी निगडित अनेक नियमांमध्ये सुधारणा करण्याची मागणी या जाहीरनाम्यातून करण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या निवडणुकीची धामधूम सुरू असून, आता डॉक्टरांनी त्यांच्या मागण्यांचा आरोग्य जाहीरनामा मांडला आहे. आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या डॉक्टरांची सुरक्षितता हा मुद्दा या जाहीरनाम्याच्या केंद्रस्थानी आहे. याचबरोबर रुग्णालयांशी निगडित अनेक नियमांमध्ये सुधारणा करण्याची मागणी या जाहीरनाम्यातून करण्यात आली आहे.



इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र विभागाने हा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. या संघटनेचे राज्यभरात ५० हजारांहून अधिक डॉक्टर सदस्य आहेत. जाहीरनाम्यात म्हटले आहे, की आरोग्यविषयक मूलभूत सेवा प्रदान करणे हे राज्य सरकारचे दायित्व आहे. त्याच वेळी ही सुविधा देणाऱ्या डॉक्टरांना सुरक्षित आणि शांततापूर्ण वातावरण मिळेल, याची जबाबदारी राज्य सरकारने घेणे आवश्यक आहे. डॉक्टरांवरील हल्ले ही नित्याची बाब झाली आहे. ही राज्यासाठी शरमेची बाब आहे. हे हल्ले कमी करण्यासाठी कठोर कायदा करण्याची आमची मागणी आहे.

### डॉक्टरांच्या प्रमुख मागण्या

- आरोग्य सुविधा कायदा २०१० मध्ये सुधारणा करावी.
- रुग्णालये आणि परिसर संरक्षित क्षेत्रे जाहीर करावेत.
- रुग्णालयांची नोंदणी, पुनर्नोंदणी प्रक्रियास सुटसुटीत करावी.
- नर्सिंग होम कायद्यातील जाचक तरतुदी मागे घ्याव्यात.
- जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापनाचे नियम शिथिल करावेत.
- महात्मा फुले जनआरोग्य योजनेत पारदर्शकता आणावी.

आरोग्य हा राज्याच्या विषय आहे. त्यामुळे मूलभूत अधिकार असलेल्या जगण्याच्या अधिकारानुसार (अनुच्छेद २१) वैद्यकीय समुदायाला सुरक्षा प्रदान करणे हे राज्याचे बंधनकारक कर्तव्य आहे. महाराष्ट्रात हा कायदा अस्तित्वात असूनही डॉक्टरांवरील हल्ले दिवसेंदिवस वाढत आहेत. या कायद्यानुसार गुन्हा दाखल होण्याचे आणि अपराध्यांस शिक्षा होण्याचे प्रमाण नगण्य आहे. इतर राज्यांच्या सुधारित कायद्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचा कायदा मिळमिळीत आहे, असेही आयएमएने जाहीरनाम्यात नमूद केले आहे.

# 'बायोडायव्हर्सिटी पार्क'मुळे तळवडेचे नाव राष्ट्रीय स्तरावर!

## ग्रामस्थ म्हणतात.."आमच्या भविष्यासाठी तुम्ही आमदार होणे महत्त्वाचे" : आमदार महेश लांडगे यांच्या पदयात्रेला प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या लौकीकात भर घालणारा 'बायोडायव्हर्सिटी पार्क' (जैवविविधता उद्यान) तळवडे येथे विकसित होत असल्यामुळे एकीकडे निसर्गाचे मूळ स्वरूप अबाधित राहणार आहे. शिवाय या प्रकल्पातून तळवडे आणि आसपासच्या गावांचे आर्थिक परिमान बदलणार आहे. तसेच, राष्ट्रीय स्तरावर गावची ओळख निर्माण होणार आहे. अशा प्रकल्पातून गावाची उन्नती, प्रगती आणि भरभराट करून देणाऱ्या आमदार महेश लांडगे यांना ग्रामस्थांचा एकमुखी पाठिंबा असल्याचा विश्वास तळवडे ग्रामस्थांनी व्यक्त केला.

भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस-आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ चिखली तळवडेतील प्रभाग क्रमांक 11 आणि 12 येथे पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ग्रामस्थांनी या भावना व्यक्त केल्या.



सुदर्शननगर, कोयनानगर, फुलेनगर, शिवाजी पार्क, स्वामी समर्थ कॉलनी, त्रिवेणी नगर, टॉवर लाईन, ताम्हाणे वस्ती येथील श्रीकृष्ण सोसायटी, गणेश सोसायटी, हनुमान सोसायटी, अजिंक्यतारा सोसायटी दरम्यान पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी नागरिकांनी गर्दी करत आमदार महेश लांडगे यांना विजयाच्या 'हॅट्रिक' च्या शुभेच्छा दिल्या. आपल्या हॅट्रिकच्या माध्यमातून आमच्या भागाचा विकास होणार आहे. दृष्टिक्षेपात आलेली कामे रखडू नये. यासाठी तुमचे आमदार होणे आमच्या गावाच्या भल्यासाठी आहे, अशा भावना देखील जेष्ठ नागरिकांनी व्यक्त केल्या. यावेळी माजी नगरसेवक, महायुतीचे पदाधिकारी, ग्रामस्थ, सोसायटीधारक यांनी पदयात्रेसाठी पुढाकार घेतला.

### शास्तीकर माफीमुळे मोठा दिलासा..

» काँग्रेस आघाडी सरकारने लादलेला शास्तीकर सरसकट माफ करून या भागातील नागरिकांना मोठा दिलासा देण्याचे काम आमदार महेश लांडगे यांनी केले आहे. आमच्या मानगुटीवर बसलेले शास्तीकराचे भूत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातूनच उतरले हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे आमदार महेश लांडगे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचे चिखली तळवडेतील नागरिकांनी ठरवले आहे.

> "मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाला कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये. यासाठी काळजीपूर्वक लक्ष दिले आहे. अंतर्गत रस्ते, पाणी यांच्या सुविधा पुरविण्याच्या महापालिकेकडे पाठपुरावा केला. चिखली-तळवडेत पर्यायी सात रस्ते विकसित होत आहेत. त्यामुळे या भागातील वाहतूक कोंडीची समस्या सुटणार आहे. वीज व्यवस्थेचा खोळंबा दूर केला आहे. वीज वितरणची अनेक प्रलंबित कामे मार्गी लावली. तसेच येत्या काळात ट्रान्सफॉर्मरची देखील कामे प्रस्तावित आहेत. मुख्य म्हणजे तळवडेतील बायोडायव्हर्सिटी पार्क हे पूर्णत्वाला नेणे महत्त्वाचे काम असणार आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा. उमेदवार भाजपा महायुती.**

# सुनील शेळके म्हणजे विकासाचा महामेरू

## गावच्या विकासासाठी सुनीलअण्णांना पुन्हा निवडून आणण्याचा ग्रामस्थांचा निर्धार

**पिंपरी | प्रतिनिधी**

आपण नेहमीच सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाण्याच्या भूमिकेतूनच काम करतो. आपण कधीच फक्त भावकीचा विचार केला नाही. आपण गावकीचा विचार करून तालुक्यातील प्रत्येक गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केला, असे मावळ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस-भाजप-शिवसेना-आरपीआय- स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष महायुतीचे उमेदवार सुनील शेळके यांनी सांगितले.

महायुतीचे उमेदवार सुनील शेळके पवनानगर, शेवती वसाहत, कडधे, ओझर्डे, राऊतवाडी, बौर या गावांचा जनसंवाद दौरा केला. त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, आरपीआय पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या महिला अध्यक्ष दीपाली गराडे तसेच ज्येष्ठ नेते गणेशअप्पा ढोरे, विठ्ठल शिंदे, पंचायत समिती सदस्य साहेबराव कारके, आदी पदाधिकारी होते.

पवन मावळात ठिकठिकाणी आमदार शेळके यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. ढोल-ताशा



व डीजेच्या दणदणाटात रांगोळ्यांच्या पायघड्या, फुलांची उधळण आणि औक्षण करीत सर्व ग्रामस्थांनी शेळके यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या.

### ओझर्डे गावात सव्वादोन कोटींची विकास कामे...

ओझर्डे गावाला आमदार शेळके यांनी सुमारे सव्वादोन कोटी रुपयांचा निधी दिल्याचे धनंजय ओझरकर यांनी सांगितले. या व्यतिरिक्त खडी आणि दोन लाख रुपयांची वैयक्तिक मदत केली. सुनीलअण्णांमुळे गावाच्या विकासाला गती मिळाली, असे ते म्हणाले. ओझर्डे गावात संदीप शेळके, भरत भोपे, विष्णू मुन्हे आदी पदाधिकारीही उपस्थित होते.

### मावळच्या विकासाचे मॉडेल जगासाठी पथदर्शक...

बौर गावात बाळू मोहोळ म्हणाले की,"मावळच्या विकासाचे मॉडेल संपूर्ण जगासाठी पथदर्शक आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्वसामान्य माणूस आमदारांच्या मागे आहे. त्यामुळे ते नक्कीच बहुमताने निवडून येतील हा विश्वास आहे. त्यासाठी सर्वांनी एक नंबरचे बटन दाबून त्यांना निवडून आणावे." संदीप खिरिड म्हणले की,"बौर गावाला मोठा विकास निधी दिल्याबद्दल मी आमदारांचे आभार मानतो, बौर गावातील तरुणांना न्याय फक्त तुम्हीच देऊ शकता, हीच आशा आहे म्हणून तुम्हाला आमचा पाठिंबा आहे"

### राऊतवाडीत १० कोटींचा विकास निधी...

राऊतवाडीतही आमदार शेळके यांचे जोरदार स्वागत झाले. त्यावेळी माजी सरपंच पोपटराव राऊत तसेच नामदेव राऊत, काळुराम राऊत, सोपान करके, भगवान लगड, शंकर लगड, आदेश लगड आदी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थितीही लक्षणीय होती. गावातील विकासकामांसाठी आमदारांनी १० कोटी रुपयांचा निधी दिला. २० लाख रुपये देऊन गावातील मंदिराचे काम पूर्ण केले. आमदारांनी कोणताही भेदभाव न करता सर्वांना मदत केली आहे," असे आदेश लगड म्हणाले.

### शेवती वसाहत येथील जंगी स्वागताने भारावून गेले सुनीलअण्णा

शेवती वसाहत येथील उत्स्फूर्त स्वागताने सुनीलअण्णा भारावून गेले. "असं जंगी स्वागत बघून मला येथे काहीच बोलायचे गरज नाही असंच वाटतेय, असे आमदार शेळके म्हणाले. राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या शेवती वसाहत अध्यक्ष वैशाली कालेकर म्हणाल्या की, शेवती वसाहत येथे आमदार शेळके यांनी तीन कोटींपेक्षा जास्तीची कामे केली आहेत.

### सुनील शेळके म्हणजे विकासाचा महामेरू...

» कडधे येथे आमदार शेळके यांच्या स्वागतासाठी ग्रामस्थ मोठ्या संख्येने जमले होते. गावच्या विकासाला आमदार शेळके यांनी ३४ कोटी रुपयांचा निधी दिल्याचे माजी सरपंच काळू तुपे यांनी सांगितले. गावात पूर्वी रस्ते नव्हते. ते काम सुनील शेळके यांनी करून दिले. ते विकासाचा महामेरू आहेत, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. विरोधकांच्या दमदाटीला कोणीही घाबरू नका, आपल्या मागे सुनीलअण्णा सारखा देवमाणूस उभा आहे,असे ते म्हणाले. सुनील शेळके म्हणाले, "आमदाराचं एकच काम म्हणजे असतं जनतेची कामे करणे. स्वतःचे घर न भरता जनतेच्या मागण्या पूर्ण करणे हे महत्त्वाचे आहे. या निवडणुकीच्या काळात जिथे कोण कोणाचे आहे, हे कळत नाही. तिथे तुमच्यासारखी मायबाप जनता माझ्यामागे ठामपणे उभी आहे,हेच माझ्यासाठी सर्व काही आहे " कडधे येथे सरपंच हरिश्चंद्र तुपे, उपसरपंच बजरंग तुपे, माजी सरपंच हिराबाई तुपे, ग्रामपंचायत सदस्य गंगाबाई तुपे, गोरख खराडे आदी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# पिंपरी ते निगडी बीआरटी बंद होण्याच्या मार्गावर

## पीएमपीएमएल अधिकाऱ्यांचे मौन, मेट्रोच्या कामामुळे आणखी एका बीआरटी मार्गावर येणार संक्रांत

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरीपासून ते निगडीपर्यंत मेट्रोच्या विस्तारीकरणाचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे शहरातील एकमेव अत्यंत चांगल्या स्थितीत सुरू असलेला बीआरटी मार्ग बंद होण्याच्या मार्गावर आहे. सातत्याने कामासाठी हा मार्ग बंद ठेवण्यात येत असून, परिणामी या मार्गावर वाहतूक करण्यासाठी पीएमपी बसला अडथळे निर्माण झाले आहेत. त्यातच बिआरटी मार्गावरी काही स्थानके देखील काढण्यात येणार असल्याने हा मार्ग भविष्यामध्ये पुन्हा सुरू होईल का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. निगडी ते आकुर्डी बीआरटी मार्ग बंद होण्याची चिन्हे आहेत.



पुणे महानगर महामंडळाच्या परिवहन (पीएमपीएमएल) बसमधून जलद प्रवास करता यावा, म्हणून पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने बस रॅपिड ट्रान्झिट मार्ग (बीआरटी) बांधले आहेत. पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहरात एकूण नऊ बीआरटी मार्ग आहेत. या सर्व मार्गावर ७२० बस चालवल्या जात आहेत. पुण्यातील बहुतांश बीआरटी मार्गाची दुरवस्था झाली आहे, तर काही बीआरटी मार्ग बंद झाले आहेत; पण पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वच बीआरटी मार्ग पूर्ण क्षमतेने सुरु आहे. शहरातील चार मार्गापैकी हा एकमेव मार्ग विनाअडथळा सुरू आहे. त्यामुळे प्रवासी वर्गदिखील वाढला होता. मात्र आता मेट्रोच्या कामामुळे हा मार्ग सातत्याने बंद ठेवावा लागत आहे.

वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गाचे काम सुरू झाल्यानंतर येरवडा ते आपले घर बीआरटी मार्गाची दुरवस्था झाली होती. पुणे-नगर महामार्गावर वारंवार होणारी वाहतूककोंडी सोडविण्यासाठी गुंजन टॉकीज चौक ते हयात हॉटेलपर्यंतचा बीआरटी मार्ग काढून टाकण्यात आला आहे. आता पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी ते दापोडी बीआरटी मार्गावरील निगडी ते आकुर्डीपर्यंतचा बीआरटी मार्ग बंद होण्याच्या वाटेवर आहे. वनाज ते रामवाडी आणि पिंपरी ते सिव्हिल कोर्ट मेट्रो सुरू झाल्यानंतर पिंपरी ते निगडीपर्यंतचा मेट्रो मार्ग विस्तारीकरणाचा निर्णय घेण्यात आला. पिंपरी ते निगडी भक्ती-शक्ती चौक या विस्तारित ४.५१ किलोमीटर एलिव्हेटेड मार्गिकेच्या कामाला सुरुवात झाली आहे. सध्या निगडीतील भक्ती-शक्ती चौकात, आकुर्डीत पिलर उभारणीचे काम सुरू झाले आहे. निगडीतील पवळे ब्रीज येथील बीआरटी मार्ग खोदण्यात आला आहे. त्यामुळे निगडी ते आकुर्डी बीआरटी लेन बंद करण्यात आली आहे; पण ही लेन कायमचीच बंद होण्याच्या मार्गावर आहे. कारण मेट्रो पिलर टाकल्यानंतर रस्ता अरुंद होणार आहे. त्यामुळे बीआरटी मार्गिकाच बंद होण्याची शक्यता आहे.

### त्या बॅनरने चर्चा रंगली सर्वत्र

**» शहरातील मुख्य रस्त्यावर लावण्यात आलेल्या या बॅनरची विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. त्यामुळे हे बॅनर पाहण्यासाठी खास नागरिक त्या ठिकाणी भेट देत आहेत. इतर वेळी राजकीय बॅनर, माहिती नागरिकांचे लक्ष वेधून घेते. मात्र त्यापुढे जाऊन निवडणूक आयोगाने लावण्यात आलेल्या या बॅनरमुळे मतदान न करणाऱ्या नागरिकांना चपराक बसली आहे. त्यामुळे यावेळी मतदान टक्का वाढेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.**

> मेट्रोच्या कामामुळे बीआरटी काही वेळा बंद असते. मात्र त्याबाबत निश्चितता नाही. नेमके किती दिवस हे काम सुरू आहे याबाबत कळवण्यात आलेली नाही.
>
> **- सतीश गव्हाणे, बीआरटी प्रमुख, पीएमपीएमएल.**

# इंद्रायणीच्या प्रदूषणाने नैसर्गिक जलस्रोत दूषित

## इंद्रायणी नदी ही लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान : गटारांसह नाल्याचे पाणी थेट नदीत

**पुणे | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदीतील सांडपाणी, रसायनमिश्रित व दूषित पाण्याची नदीपात्राबरोबरच परिसरातील गावांनाही बाधा पोहचू लागली आहे. कुरुळी, मोई, चिंबळी, निघोजे आदी परिसरातील पाण्याचे स्रोत दूषित झाले असून, ग्रामस्थांबरोबरच शेतीचे आरोग्यही धोक्यात आले आहे. इंद्रायणी नदी ही लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असून, एकेकाळी खेड-हवेली तालुक्याची जीवनदायिनी म्हणून ओळखली जात होती.



मात्र, हीच जीवनदायिनी सध्या गटारगंगा झाली आहे. नदीपात्रातील प्रदूषणामुळे जलचर नाहीसे झाले आहेत. नदीसुधार प्रकल्पाची चर्चा वेळोवेळी होते. मात्र, यावर ठोस अशी उपाययोजना केली जात नाही. नदीपात्र स्वच्छ व सुंदर असावे अशी कल्पना या भागातील लोकप्रतिनिधींसह पालिका अधिकारी मांडतात. मात्र, कोणीही लक्ष देत नाही. शिवाय प्रदूषण महामंडळदेखील दुर्लक्ष करीत आहे.

श्रीक्षेत्र देहूपासून ते आळंदीदेवाचीपर्यंत इंद्रायणी नदीलगतच्या गावांमधून तसेच पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणारी गटारे, नाल्यांतील दूषित व रसायनमिश्रित पाणी नदीपात्रात सोडण्यात आले आहे. नदीवरील पुलावरून ठिकठिकाणी कचरा, राडारोडा, टाकण्याचे काम राजरोसपणे चालू आहे. या प्रकारामुळे इंद्रायणी गटारगंगा झाली असून, आता इंद्रायणी नदीमध्ये जलपर्णी वाढू लागली आहे. नदीत दिवसाआड केमिकलयुक्त फेस येत आहे.

नदीसुधार प्रकल्पाचे काम कागदावरच असल्याने नागरिकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. परिसरातील काही कंपन्या दूषित पाण्यावर प्रक्रिया न करता थेट नदीपात्रात पाणी सोडतात अशा कंपन्यांवर कारवाई का केली जात नाही, असा प्रश्न इंद्रायणी नदीलगतच्या ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

### दशक्रिया विधीसाठी टँकरचे पाणी

**» नदीतील सांडपाणी व रसायनमिश्रित पाण्यामुळे शेतीपिकाला तसेच शेतकऱ्यांना त्रास होत आहे. शेतकऱ्यांच्या अंगाला खाज सुटते. डासांच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांना शेतात काम करणे अवघड झाले आहे. पिकांचे उत्पादन कमी व खर्च जास्त होत आहे. तसेच परिसरातील गावांतील ग्रामस्थांना दशक्रिया विधीच्या कार्यक्रमासाठी टँकरने पाणी घ्यावे लागत आहे.**